भारतीय विद्या भवनचे
**सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय**
मुन्शी नगर, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०००५८.

PO/2026/013

Date: 10.02.2026

# छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव - २०२६

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आपल्या संस्थेच्या प्रशिक्षण व आस्थापना विभागातर्फे **गुरुवार दि. १९ फेब्रुवारी २०२६** रोजी **सकाळी १०.३० वाजता "छत्रपती शिवाजी महाराज: अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन शास्त्रातील आद्यगुरू"** या विषयावर, प्रसिध्द्ध इतिहास अभ्यासक व शिवव्याख्याते **श्री. रविराज पराडकर** यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आलेले आहे.

श्री. पराडकर यांनी वयाच्या १६ व्या वर्षापासून शिवचरित्र आणि इतिहास प्रसार कार्यासाठी महत्वपूर्ण योगदान दिलेले आहे. त्यांनी सर्व गडकिल्ल्यांवर पदभ्रमंती केलेली असून, ऐतिहासिक वस्तू, वास्तू, दस्तावेज, ग्रंथ यांचा विशेष अभ्यास केलेलं आहे. त्यांनी सन १९९४ साली **रायगडावर श्रीशिवराजाभिषेकदिनोत्सवाची परंपरा** सुरू केली. त्यामुळे **शिवराजाभिषेकदिनोत्सवाचे संस्थापक** म्हणून श्री. पराडकर यांच्याबद्दल शिवभक्तांमध्ये विशेष आदर आहे. त्यांनी आजतागायत शिवचरित्र, शंभुचरित्र, मराठयांचा इतिहास, स्वामी विवेकानंद, स्वा. सावरकर अशा अनेक विषयांवर सुमारे ५५०हून अधिक व्याख्याने दिलेली आहेत .

छत्रपती शिवाजी महाराज हे इ. स. १८१८ पर्यन्त टिकलेल्या आणि आपल्या परमोत्कर्षाच्या अवस्थेत भारतीय उपखंडाचा बराचसा भाग व्यापणाऱ्या मराठा साम्राज्याचे संस्थापक व अद्वितीय रणनितिज्ञ, कुशल प्रशासक आणि स्त्रीसन्मान व धर्मनिरपेक्षतेचे पुरस्कर्ते होते. त्यांच्या दूरदृष्टी, शौर्य आणि लोककल्याणकारी राज्यकारभारामुळे त्यांनी केवळ महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण भारताला स्वाभिमान व स्वराज्याची प्रेरणा दिली. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य संरक्षणासाठी प्रतापगड व रायगड सारखे किल्ले, शाश्वत आणि नाविन्यपूर्ण तंत्रांचा वापर करून उभे केले, कोकण किनाऱ्यावर नौदल तळाची (सिंधुदुर्ग) स्थापना केली. त्यामुळे ते "भारतीय नौदलाचे जनक" मानले जातात. मला खात्री आहे की, या व्याख्यानाच्या निमित्ताने सर्व श्रोत्यांना शिवाजी महाराजांच्या अभियांत्रिकी व व्यवस्थापन शास्त्रातील अद्भुत कामगिरीचे स्मरण करण्याची संधी मिळेल.

छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव सोहळा निमित्त या व्याख्याना व्यतिरिक्त विद्यार्थी वसतीगृह समितीने इतरही विविध कार्यक्रमांचे संस्थेमध्ये आयोजन केलेले आहे. सदर कार्यक्रमाची रूपरेषा स्वतंत्रपणे पाठविण्यात येईल. तरी, आपल्या संस्थेमधील व भारतीय विद्या भवन, अंधेरी परिवरातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या कार्यक्रमात आवर्जून सहभागी व्हावे असे आवाहन मी सर्वांना करतो.

**(डॉ. मोहन मुरुडी)**
**प्र. प्राचार्य**
**सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय,**
**अंधेरी (प), मुंबई-५८**

# छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव - २०२६



व्याख्यान

## छत्रपती शिवाजी महाराज:
## अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन शास्त्रातील आद्यगुरू

वक्ते: श्री. रविराज पराडकर
१९ फेब्रुवारी २०२६, सकाळी १०.३० वाजता,
सेमिनार हॉल ११९

## सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय, अंधेरी (प), मुंबई